ePaper **जो रामाचा-तो कामाचा... धीरेंद्र शास्त्रींकडून देवेंद्र फडणवीसांचं तोंडभरून कौतुक**




| वर्ष - 7 । अंक - 195 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत


- आधी काही खेळाडूंची अदलाबदल
- तापसीच्या प्रेमात शाहरुख
- अमेठीला गेलो नाही तरी नवरदेव
- ३४९५ एसटी बसेस सेवेत दाखल?



www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 23 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## सोसायटीधारकांच्या तक्रार निवारणासाठी

# सहकार विभागाची ‘एसओपी’!

### सदनिकाधारकांना दिलासा : तक्रारी सोडविण्याच्या कार्यपद्धतीमध्ये सुसूत्रता

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे, पिंपरी-चिंचवड मुंबई, ठाण्यासह महाराष्ट्रातील सुमारे सव्वालाख गृहनिर्माण सोसायट्यांना आणि त्यातील रहिवाशांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, तक्रारींचे निराकरण करण्यासाठी आता सहकार विभागाने नियमावली किंवा कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.**




यासाठी विभागाने समिती नियुक्त करण्यात आली असून, त्यांच्या माध्यमातून तक्रारी सोडविण्यासाठी कोणती कार्यपद्धती असावी हे निश्चित केले जाणार आहे. तक्रारी सोडविण्याची कार्यपद्धतीमध्ये सुसूत्रता येणे शक्य होणार आहे. नव्या वर्षात त्याची अंमलबजावणी होणार आहे.

पुण्यासह राज्यातील सहकारी गृह निर्माण सोसायट्यांमधील सदस्यांना त्यांच्या समस्या घरबसल्या सोडविता याव्यात यासाठी सहकार विभागाने पुढाकार घेतला आहे. 'सहकार संवाद' नावाचे ऑनलाइन पोर्टल कार्यान्वित केले आहे. या पोर्टलद्वारे राज्यातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांसह तेथील रहिवाशांना तक्रारी करता येणार आहे. तसेच त्याचा पाठपुरावाही करता येणे शक्य होणार आहे.



### ‘एसओपी’साठी समिती

- गृहनिर्माण सोसायट्या आणि त्यामध्ये राहणाऱ्या रहिवाशांना विविध तक्रारी आहेत.
- तक्रारींचे निराकरण करताना त्यात कोणताही पक्षपात होऊ नये, कोणावरही अन्याय होऊ नये.
- राज्यातील सर्वच विभागातील सहकारी विभागातील अधिकाऱ्यांकडून तक्रारी सोडविताना सूसुत्रता असावी.
- एकाच नियमाचा आधार असावा.
- सहकार विभागातील तीन उपसंचालक तसेच गृहनिर्माण सोसायट्यांमधील एक अशा चार जणांची समिती तयार केली.
- समितीकडून सुमारे २३ प्रकारच्या तक्रारींचा अभ्यास करणार.

### दोन महिन्यात सातशे तक्रारी...

- 'सहकार संवाद' या ऑनलाइन पोर्टलवर गेल्या दोन तीन महिन्यात सुमारे सातशे तक्रारी आल्या आहेत. त्यात सर्वाधिक तक्रारी मुंबई आणि उपनगरांमधून आल्या असून त्या ४१७ एवढ्या आहेत. त्या पाठोपाठ कोकण ठाणे भागातून १४० तर पुण्यातून १३६ तक्रार नोंदविल्या गेल्या आहेत, अशी माहिती सहकार विभागाने दिली.

# मोशीत देशातील सर्वात मोठे गोवंश- अश्व प्रदर्शन!

### अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचा पुढाकार : 1 हजाराहून अधिक पशुपालकांची नोंदणी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गोवंश संवर्धनाचा संदेश देण्यासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये देशातील सर्वात मोठे अश्व व देशी गोवंश पशू प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पशू पालकांना ‘रेकॉर्ड ब्रेक’ उपक्रमात सहभागी होण्याची संधी निर्माण झाली आहे. या प्रदर्शनासाठी देशभरातून पशूपालकांनी नोंदणी केली आहे.**



बैलगाडा शर्यत बंदी उठवण्यासाठी गल्लीपासून दिल्लीपर्यंत यशस्वी (PIMPRI)लढा उभारणारे आणि गोसंवर्धनासाठी चळवळ उभी करणारे गोरक्षक आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त अखिल भारतीय बैलगाडा संघटनेच्या पुढाकाराने पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवडमध्ये आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र, मोशी येथे 25 व 26 नोव्हेंबर 2023 रोजी भव्य देशी गोवंश प्रदर्शन व पशु आरोग्य शिबीर भरविण्यात येणार आहे.

भारतातील सर्व जातीचे अश्व व गोवंश पशू प्रदर्शन तसेच आरोग्य शिबीरासह एकूण 17 प्रकारातील पशूंचा‘ रॅम्प वॉक’ असलेले हे देशातील पहिले देशी गोवंश पशू प्रदर्शन आहे. देवनी, खिल्लार, लाल कंधारी, साहिवाल, लाल सिंधी, गीर, ओंगोले, वेचूर अशा विविध गोवंशासाठी प्रजातिनिहाय स्पर्धा घेण्यात येणार आहे. स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे क्रमांक काढण्यात येणार आहेत. पहिल्या क्रमांकाच्या गोवंश आणि पशूंचे ‘रॅम्प वॉक’ होणार आहे, असा प्रयत्न भारतात प्रथमच होत आहे.

### भावी पिढीला गोवंशाचे महत्त्व कळावे...

कोविड सारख्या महामारीच्या काळात देशी गोवंशाचे आणि त्याच्या उत्पादनाचे महत्त्व जगाला कळले आहे. त्यामुळे याबाबत जनजागृती आणि गो संवर्धनाचा संदेश तळागाळात पोहोचला पाहिजे. तसेच, पुणे जिल्ह्यातील शासकीय व अशासकीय शाळांच्या विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी. ज्यामुळे भावी पिढीलासुद्धा गोवंशाचे महत्त्व कळेल. गतवर्षी खिल्लार या एकाच प्रकारातील प्रदर्शनामध्ये 250 हून अधिक गोवंश सहभागी झाले होते. यावर्षी विविध देशी प्रजातींचे 1 हजाराहून अधिक पशू प्रदर्शनामध्ये सहभागी होतील, असा अंदाज आयोजकांनी व्यक्त केला आहे. या प्रदर्शनाच्या निमित्ताने आरोग्य शिबिरासाठी वैद्यकीय पथक सज्ज करण्यात आले आहे.

# माझ्या बोलण्यात सुधारणा केली:धीरेंद्र शास्त्री

## भारत हिंदूराष्ट्र व्हावं हा संकल्प घेऊन निघालो आहे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी संत तुकाराम महाराजांवर वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी महाराष्ट्रात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीसह अनेक संघटना आक्रमक झाल्या. तसेच त्यांनी धीरेंद्र शास्त्रींच्या दाव्याला आव्हानही दिलं. या पार्श्वभूमीवर धीरेंद्र शास्त्रींनी बुधवारी (२२ नोव्हेंबर) देहूत जाऊन संत तुकाराम महाराज मंदिरात दर्शन घेतलं.**



यावेळी पत्रकारांनी धीरेंद्र शास्त्रींना संत तुकाराम महाराजांवर केलेल्या वादग्रस्त वक्तव्याच्या चुकीची जाणीव झाली का? असा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी त्यांची भूमिका मांडली. धीरेंद्र कृष्ण शास्त्री म्हणाले, “मी तेव्हा एक लेख वाचला होता. त्या लेखाच्या आधारे मी त्या भाषेत बोललो होतो. त्याआधीही मी महाराष्ट्रात आलो होतो. त्यामुळे मला संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांच्याविषयी माहिती आहे. मी त्यांच्याविषयी जेवढं शक्य होतं तेवढं वाचलं आहे. मी असं कधीही कोणत्याही संताविषयी म्हटलेलं नाही. तेव्हा बोलताना माझ्यावर स्थानिक भाषेचा प्रभाव होता. कुणी साखर म्हणतं, तर कुणी शुगर म्हणतं. त्यामुळे मी निश्चितपणे स्वीकारलं की, माझ्या बोलण्यामुळे वारकरी संप्रदाय आणि संत तुकाराम महाराजांना मानणाऱ्या लोकांच्या भावना दुखावल्या. माझ्या बोलण्यात काही दोष असेल तर, तो मी स्वीकारला आणि सुधारणा केली,” असं मत धीरेंद्र शास्त्रींनी व्यक्त केलं. मी आचार्य परंपरेचा साधक आहे. असा व्यक्ती कोणत्याही संताचा विरोध करेल असं होणार नाही. तसेच असा विरोध करणारा संतांचा अनुयायी होऊच शकत नाही. मी भारत हिंदूराष्ट्र व्हावं हा संकल्प घेऊन निघालो आहे. त्यामुळे मी संत महात्म्यांची प्रशंसा करण्याऐवजी विरोध करत असेल, तर पाश्चिमात्य संस्कृतीचे संस्कार आमचा हा प्लॅनच गिळून टाकतील. म्हणूनच मी हात जोडून संपूर्ण वारकरी संप्रदायासमोर खेद व्यक्त केला होता,” असंही धीरेंद्र शास्त्री यांनी नमूद केलं. धीरेंद्र शास्त्री म्हणाले, “मी संत तुकाराम महाराजांच्या शीलेचं दर्शन घेतलं. त्यांनी आपले अभंग इंद्रायणी नदीत सोडून दिले होते. मात्र, संत तुकारामांच्या तपस्येमुळे ते अभंग नदीत बुडाले नाहीत. त्यांना पाण्याचा स्पर्शही झाला नाही आणि ते पाण्यावर तरंगले. ही संतांची परंपरा आहे.” भारत अद्भूत देश आहे. या संतांचा आशीर्वाद कायम राहिला, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचं स्वप्न संपूर्ण भारतात यशस्वी होईल. तसेच भारत हिंदूराष्ट्र होईल, अशीच प्रार्थना मी केली आहे,” असंही धीरेंद्र शास्त्रींनी नमूद केलं.

### मी आचार्य परंपरेचा साधक

» मी असं कधीही कोणत्याही संताविषयी म्हटलेलं नाही. तेव्हा बोलताना माझ्यावर स्थानिक भाषेचा प्रभाव होता. कुणी साखर म्हणतं, तर कुणी शुगर म्हणतं. त्यामुळे मी निश्चितपणे स्वीकारलं की, माझ्या बोलण्यामुळे वारकरी संप्रदाय आणि संत तुकाराम महाराजांना मानणाऱ्या लोकांच्या भावना दुखावल्या. माझ्या बोलण्यात काही दोष असेल तर, तो मी स्वीकारला आणि सुधारणा केली,” असं मत धीरेंद्र शास्त्रींनी व्यक्त केलं. मी आचार्य परंपरेचा साधक आहे. असा व्यक्ती कोणत्याही संताचा विरोध करेल असं होणार नाही. तसेच असा विरोध करणारा संतांचा अनुयायी होऊच शकत नाही. मी भारत हिंदूराष्ट्र व्हावं हा संकल्प घेऊन निघालो आहे. त्यामुळे मी संत महात्म्यांची प्रशंसा करण्याऐवजी विरोध करत असेल, तर पाश्चिमात्य संस्कृतीचे संस्कार आमचा हा प्लॅनच गिळून टाकतील.

# देवेंद्र फडणवीस बागेश्वर बाबांपुढे लीन

## पुण्यात बागेश्वर धाम यांचं दर्शन घेतलं

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महत्त्वाकांक्षी समान पाआज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात जाऊन बागेश्वर धाम धीरेंद्र शास्त्री यांचं दर्शन घेतलं. देवेंद्र फडणवीस बागेश्वर बाबांपुढे नतमस्तक झाले. त्यावेळी बागेश्वर बाबांनीही देवेंद्र फडणवीस यांचं कौतुक केलं. देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री आहेत म्हणून मी त्यांचं कौतुक केलेलं नाही. ते रामभक्त आहेत म्हणून मी त्यांच्याविषयी बोलतो आहे, जे रामाचे भक्त असतात ते सगळ्यांचे असतात. जे रामाचे भक्त नसतात ते कुणाचेच नसतात असं वक्तव्य बागेश्वरबाबांनी केलं.**



बागेश्वर बाबा सनातन धर्माची सेवा करत आहेत. सनातन धर्मासाठी जनजागृती करत आहेत. जर भारताची जागृती झाली तर जगाची जागृती होईल. रामलल्ला जिथे विराजमान होते तिथेच प्रभू रामाचं मंदिर होतं आहे आणि २२ जानेवारीच्या दिवशी तिथेच रामलल्लाची प्रतिष्ठापना होते आहे. बागेश्वर बाबा जेव्हा सनातन धर्माची गोष्ट करतात तेव्हा अनेक लोक त्यांना नावं ठेवतात. त्यांचा अपप्रचार करतात. सनातन म्हणजे जातीयवाद, परंपरावाद असं काहीजण म्हणतात. पण त्यांना सनातनचा अर्थच कळलेला नाही. सनातनचा अर्थ म्हणजे जे अनादी आणि अनंत आहे ते सनातन आहे. जो सगळ्यांना एकत्र बांधणारा विश्वास आहे, आपण सगले देवाची लेकरं आहोत या विचाराने सनातन धर्म पुढे जातो आहे. पुण्याचं भाग्य आहे की बागेश्वर बाबा याठिकाणी आले. त्यांनी रामकथाही सांगितली. जो रामकथा ऐकतो त्याचं आयुष्य सार्थकी लागतं असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले. बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी संत तुकाराम महाराजांवर वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी महाराष्ट्रात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीसह अनेक संघटना आक्रमक झाल्या. तसेच त्यांनी धीरेंद्र शास्त्रींच्या दाव्याला आव्हानही दिलं.

### मी तेव्हा एक लेख वाचला होता

» या पार्श्वभूमीवर धीरेंद्र शास्त्रींनी बुधवारी (२२ नोव्हेंबर) देहूत जाऊन संत तुकाराम महाराज मंदिरात दर्शन घेतलं. यावेळी पत्रकारांनी धीरेंद्र शास्त्रींना संत तुकाराम महाराजांवर केलेल्या वादग्रस्त वक्तव्याच्या चुकीची जाणीव झाली का? असा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी त्यांची भूमिका मांडली. धीरेंद्र कृष्ण शास्त्री म्हणाले, “मी तेव्हा एक लेख वाचला होता. त्या लेखाच्या आधारे मी त्या भाषेत बोललो होतो. त्याआधीही मी महाराष्ट्रात आलो होतो. त्यामुळे मला संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांच्याविषयी माहिती आहे. मी त्यांच्याविषयी जेवढं शक्य होतं तेवढं वाचलं आहे. मी असं कधीही कोणत्याही संताविषयी म्हटलेलं नाही.”

# पसार झालेला कैदी पुन्हा कारागृहात हजर

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

पसार झालेला कैदी बुधवारी सकाळी पुन्हा कारागृहात परतला. जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या कैद्याला वृद्ध आई-वडिलांची काळजी वाटल्याने तो पसार झाल्याचा दावा कारागृह प्रशासनाने केला आहे. बुधवारी सकाळी आई-वडिलांनी त्याला पुन्हा येरवडा कारागृहात हजर केले. जन्मठेपची शिक्षा भोगत असलेला कैदी आशिष भरत जाधव हा सोमवारी (२० नोव्हेंबर) येरवड्यातील खुल्या कारागृहातून पसार झाला. आईला हृदयविकाराचा झटका आल्याने तिला भेटण्यासाठी जाधव कारागृहातून पसार झाल्याची माहिती येरवडा पोलिसांनी दिली. वारजे माळवाडी परिसरात २००८ मध्ये झालेल्या खूनाच्या गुन्ह्यात जाधवला २०१५ मध्ये जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. वर्तणुक चांगली असल्याने कारागृह प्रशासनाने १६ ऑगस्ट २०२२ रोजी जाधवची खुल्या कारागृहात रवानगी केली होती. जाधवला कारागृहातील अन्नधान्य विभागात काम देण्यात आले होते. सोमवारी सकाळी तो येरवड्यातील खुल्या कारागृहातून तो पसार झाला. त्याचा शोध घेण्यात येत होता. याबाबत येरवडा पोलीस ठाण्यात कारागृह अधिकाऱ्यांनी तक्रार दिली होती. येरवडा पोलिसांनी त्याच्या नातेवाईकांशी संपर्क साधला होता. चौकशीत जाधवच्या आईला हृदयविकाराचा झटका आल्याची माहिती मिळाली. वृद्ध आई-वडिलांच्या काळजीपोटी तो कारागृहातून पसार झाल्याचे कारागृह प्रशासनाचे म्हणणे आहे. बुधवारी सकाळी जाधवच्या आई वडिलांनी त्याला कारागृहात हजर केले. याबाबतची माहिती येरवडा पोलिसांना देण्यात आली. येरवडा पोलिसांनी जाधव याला ताब्यात घेतले. कारागृहातून पसार झाल्या प्रकरणी जाधवविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शरद पवार गटात ‘बंडाळी’!

## शहराध्यक्ष निवडीवरून पदाधिकाऱ्यांमध्ये मतभेद

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पक्षात दुफळी पडल्यानंतर खा. शरद पवार गटाने पिंपरी-चिंचवड शहरात पक्षवाढीसाठी दंड थोपटून मोठ्या उत्साहात सुरूवात केली खरी. मात्र ताकद वाढण्याआधीच पक्षवाढीला खीळ बसली आहे. शहराध्यक्षांची झालेली निवड अनेकांना खटकणारी ठरली. त्यामुळे सुरूवातीला जोमाने कामाला लागलेले पदाधिकारी आता आपली ‘तलवार म्यान’ करून बसल्याचे चित्र आहे.**






पिंपरी-चिंचवड हा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बालेकिल्ला मानला जातो. अजित पवार सांगतील तीच पूर्व दिशा मानणारे पदाधिकारी आणि कार्यकर्ते आहेत. मध्यंतरी राष्ट्रवादीत फूट पडली. उपमुख्यमंत्री दादांची ताकद पाहून अनेकांनी मोठ्या पवारांचे स्थान हृदयात ठेवून प्रत्यक्ष उघड साथ छोट्या दादांनाच देण्याची भूमिका घेतली. दादांच्या बालेकिल्ल्याला हादरा देण्याची धुरा खा. शरद पवार गटाच्या शिलेदारांनी घेतली. त्यामध्ये प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आघाडीवर होते. त्यांनी नव्या आणि संधी न मिळालेल्या नेतृत्वांना पुढे आणण्याची खेळी केली. विधानसभेच्या तीनही मतदारसंघात समन्वय नेमले. त्यांच्यावर पक्षवाढीची धुरा दिली. काशिनाथ नखाते यांना कामगार विभागाच्या राज्याची जबाबदारी दिली. शहरात पक्षाच्या बैठका वाढविल्या. आमदार




रोहित पवारांना सातत्याने दौरे करण्याच्या सूचना देण्यात आल्या. खा. सुप्रिया सुळे देखील शहरात भेटी गाठी घेऊ लागल्या. पक्षवाढीसाठी नवे पदाधिकारी नेटाने पळू लागले. मात्र शहराध्यक्षपदाची निवड नव्या पदाधिकाऱ्यांच्या उत्साहाला ‘ब्रेक’ लावणारी ठरली.

माजी नगरसेवक तुषार कामठे यांची शहराध्यक्षपदी झालेली निवड अनेकांना खटकणारी आहे. काही जणांनी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार रोहित पवार यांच्याकडे उघड नाराजी व्यक्त केल्याची चर्चा आहे. मात्र त्यांच्या तक्रारीला दाद देण्यात आली नाही. माजी नगरसेवक मच्छिंद्र तापकीर अथवा जालिंदर शिंदे यांच्या नावाला नवे पदाधिकारी पसंती देत होते. ही दोनही नावे डावलल्याने युवकाध्यक्ष इम्रान शेख यांच्यासह काही प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर होता. तो अद्यापही कायम आहे. त्यामुळे खा. शरद पवार गटात पक्षवाढीपुर्वीच मरगळ आल्याचे चित्र आहे. पक्ष वाढीसाठी नेत्यांनी बळ देऊन पदाधिकाऱ्यांनीही मोठ्या उत्साहात काम करणे आवश्यक आहे.

### प्रदेशाध्यक्ष पाटील, आमदारपवार समर्थकांमध्ये स्पर्धा...

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यानंतर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अप्रत्यक्ष शहरात लक्ष घालायला सुरूवात केली आहे. दादांच्या बालेकिल्ल्याला जयंत पाटील यांनी सुरूंग लावण्यास आधीपासूनच सुरूवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून आपले समर्थक वाढविण्यावर पाटील यांनी भर दिला आहे. त्यानुसार राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी सुनिल गव्हाणे, युवकच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी रविकांत वरपे, कामगार आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी काशिनाथ नखाते यांना पाटील यांनी बळ दिले आहे. शहराध्यक्ष निवडीतही यांची भूमिका महत्त्वाची ठरणार होती. मात्र आमदार रोहित पवार यांच्या सांगण्यानूसार तुषार कामठे शहराध्यक्ष झाले. त्यामुळे या निवडीनंतर शहरात खा. पवारांच्या राष्ट्रवादीत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि आमदार रोहित पवार समर्थकामध्ये स्पर्धा पहायला मिळत आहे.

### उद्घाटन लांबच, कार्यालयच बंद करण्याची वेळ...

**खा. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे शहर कार्यालय चिंचवड विधानसभा मतदारसंघात उभारण्यात आले होते. खा. पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात या कार्यालयाचे उद्घाटन करण्याची तयारी सुरू केली होती. मात्र शहराध्यक्ष निवडीमुळे झालेल्या नाराजीत कार्यालयाचे उद्घाटन रखडले असून सदर कार्यालय बंदच करण्याची नामुष्की ओढावली आहे. सध्या कार्यालय पिंपरी विधानसभा मतदारसंघात सुरू करण्यात येणार आहे. त्याचे काम सुरू असून, लवकरच उद्घाटन करण्यात येईल, असे पदाधिकारी सांगत आहेत.**

---

# पिंपरी-चिंचवडमध्ये होणार श्रीरामनामाचा जागर!

## विश्व हिंदू परिषदेचा पुढाकार : अयोध्येत मंदिर लोकार्पण सोहळ्याचे स्वागत

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अयोध्येत 22 जानेवारी 2024 रोजी बहुप्रतीक्षित श्रीराम मंदिराचे लोकार्पण होणार आहे. यानिमित्ताने सर्वत्र उत्साहाचे वातावरण असून, पिंपरी -चिंचवडकर नागरिक देखील या भव्य दिव्य सोहळ्याचे शहरात विविध कार्यक्रम, उपक्रमांद्वारे जल्लोषात स्वागत करणार असल्याची माहिती विश्व हिंदू परिषदेचे पुणे विभाग मंत्री नितीन वाटकर यांनी दिली आहे.**



या संदर्भात नुकतीच निगडी प्राधिकरण येथील सावरकर सदन येथे शहरातील विविध सामाजिक, अध्यात्मिक – सांस्कृतिक, सेवाभावी, विविध ज्ञाती संस्था, सार्वजनिक उत्सव मंडळे, राजकीय पक्ष, संघटनांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत महत्वपूर्ण बैठक उत्साहात संपन्न झाली. बैठकीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पिंपरी-चिंचवड जिल्हा संघचालक विनोद बन्सल, विश्व हिंदू परिषदेचे शहर अध्यक्ष शरद इनामदार उपस्थित होते.

अयोध्येत मंदिर लोकार्पण सोहळ्यासाठी सर्व भाविकांना उपस्थित राहणे शक्य नसल्याने ‘माझे गाव माझी अयोध्या’ या संकल्पनेनुसार सकल हिंदू समाज भाविकांनी आपल्या परिसरात, घरीदारी धार्मिक अनुष्ठान, नामसंकीर्तन करीत स्थानिक मंदिरात आरती, प्रसाद वितरण करून लोकार्पण सोहळ्याचे थेट प्रक्षेपण मोठ्या पडद्यावर दाखवून आनंदोत्सव साजरा करावा यानिमित्त परिसरात रांगोळ्या, घरांवर भगवे ध्वज आणि पताका लावून परिसर सुशोभित करावा, सायंकाळी घरांसमोर किमान पाच दिवे प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा करण्याचे आवाहन विश्व हिंदू परिषदेने केले आहे.

मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्रांची, रामलला मूर्तीची प्राणप्रतिष्ठा अयोध्येला राममंदिरात होणार आहे. त्याआधी शहरातील घरोघरी 1 ते 15 जानेवारी 2024 या दरम्यान अयोध्येवरून आलेल्या पवित्र अक्षता देऊन निमंत्रण देण्यात येणार आहे. 22 जानेवारी 2024 ला मंदिर केंद्रित कार्यक्रम शहरातील सर्व भागात होणार असून पिंपरी-चिंचवड मधील सर्व रामभक्तांनी सहभागी होण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.

### बैठकीला 250 हून अधिक प्रतिनिधी...

**शहरातील सर्वच सामाजिक, अध्यात्मिक-सांस्कृतिक क्षेत्रातील संस्था – संघटना, राजकीय पक्ष मोठ्या प्रमाणात विविध कार्यक्रम, उपक्रमाचे आयोजन करणार असल्याचे संस्थांच्या प्रतिनिधींनी सांगितले. बैठकीचे प्रास्ताविक विश्व हिंदू परिषदेचे नितीन वाटकर यांनी तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह महेश्वर मराठे यांनी समारोप केला. बैठकीला शहरातील विविध संस्था संघटनांचे जवळपास 250 प्रतिनिधी उपस्थित होते.**

# कामगार कल्याण प्रशासनाची 85 वर्षे




**हा वारसा ज्ञानोबा – तुकोबा परंपरेतील संत, शिवाजी महाराज – शाहू महाराज यांच्या सारखे राज्यकर्ते, फुले – आंबेडकर यांच्या सारखे सुधारक, विचारवंत, विविध सामाजिक राजकीय चळवळीत सहभागी झालेल्या आणि बलिदान दिलेल्या बुद्धिजीवी, श्रमजीवी, शेतकरी, कामगार अशा अनेक घटकांमध्ये आपल्याला सापडतो.**

महाराष्ट्राला लाभलेल्या पुरोगामित्वाच्या वारशाचे प्रतिबिंब स्वातंत्र्यपूर्व काळापासून म्हणजेच मुंबई प्रांत असल्यापासून विविध सामाजिक – राजकीय चळवळींमध्ये आणि ओघानेच सरकारी धोरणांमध्ये उमटलेले दिसते. मुंबईत पहिली कापड गिरणी १८५४ मध्ये सुरू झाली आणि या गिरण्यांची संख्या १८७० पर्यंत १३ तर १८९५ पर्यंत अधिक वेगाने वाढत ८३ वर पोहोचली. या गिरण्यांमध्ये काम करण्यासाठी मोठ्या संख्येने कामगार येऊ लागले. मुंबई प्रांतात १८८० पासून कामगार विषयक सुधारणांसाठी आवाज उठवायला सुरुवात झाली, १८८४ मध्ये बॉम्बे मिल हॅन्ड्स असोसिएशन ही देशातील पहिली कामगार संघटना रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबईत स्थापन केली. कामगारांना काही जुजबी सवलती देणारे आणि त्यांच्या शोषणावर जुजबी नियंत्रण आणणारे कायदे व्हायला सुरुवात झाली. १८९० पासून दर रविवारी



आठवड्याची सुट्टी कामगारांना मिळू लागली. मुंबईतील कापड गिरण्यांमध्ये राबणारा बहुतांश कामगार देशावरील आणि कोकणातील खेड्यांमधून येत होता, त्याला राहण्यासाठी पुरेशी जागा मिळत नव्हती. अशिक्षित, अल्पशिक्षित आणि बहुतेकदा कुटुंबाशिवाय मुंबईत एकटा राहणारा हा कामगार फावल्या वेळेतील सकारात्मक मनोरंजन साधनांच्या अनुपलब्धतेमुळे वाम मार्गाला लागत होता. दारूचे गुत्ते, कुंटणखाने, सावकार-पठाण यांच्या विळख्यातुन अशा कामगाराचा पगार कुटुंबापर्यंत पोहचत नव्हता. यातून कुटुंबाची ससेहोलपट तर होतच होती, त्यासोबतच कामगारांची कामावरील हजेरी आणि कार्यक्षमता कमी होऊन कापड गिरण्यांच्या उत्पादनावर देखील विपरीत परिणाम होत होता. मुंबई प्रांतात पहिले लोकनियुक्त सरकार १९३७ साली स्थापन झाले. या सरकारने कारखान्यात आणि कारखान्याबाहेर या कामगारांच्या कल्याणासाठी काय योजना आखता येतील याचा अभ्यास केला. कामगारांचा फावला वेळ सत्कारणी लागावा, कामगारांना दर्जेदार करमणुकीची साधने मिळावीत, त्यांच्या सुप्त कला – क्रीडा गुणांना व्यासपीठ मिळावे यासाठी सुविधा आवश्यक असल्याचे समोर आले. या कामात पोद्दार मिलच्या मालकाने पुढाकार घेतला, पोद्दार मिलच्या माध्यमातून मुंबईत त्यावेळच्या डिलाईल रोड भागात कामगारांसाठी एक प्रशस्त असे रिक्रिएशन सेंटर उभारले आणि ते जागेसह तत्कालीन मुंबई प्रांत सरकारला देणगी स्वरूपात २२ नोव्हेंबर १९३८ रोजी हस्तांतरित केले. या केंद्रात कामगारांना वाचनासाठी दैनिक वृतपत्रे, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी आवश्यक जागा, मैदानी व बैठ्या खेळांसाठी आवश्यक सुविधा पुरविण्यात आल्या. अशा रीतीने मुंबईच्या कामगार वस्तीत कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी कल्याणकारी सुविधा उपलब्ध करून देणारं देशातलं पहिलं सरकार संचलित कामगार कल्याण केंद्र सुरू झालं. या घटनेला २२ नोव्हेंबर २०२३ रोजी ८५ वर्षे पूर्ण होत आहेत. मुंबईत सुरू झालेल्या या कामगार कल्याण केंद्राची सिद्धता विचारात घेऊन मुंबई प्रांतातील अहमदाबाद, सोलापूर, इचलकरंजी अशा औद्योगिक शहरांमध्ये देखील ही केंद्रे सुरू केली गेली. मुंबई प्रांतीय सरकारच्या कामगार खात्याचे एक अविभाज्य अंग बनलं. कामगार खात्यात कामगार कल्याणाची एक स्वतंत्र शाखा उघडून, त्यात कामगार कल्याणाचा एकसूत्रीपणाने विचार सुरू झाला. त्या खात्यात कामगार उप-आयुक्ताचे एक स्वतंत्र पद निर्माण करण्यात आले आणि त्याच्याकडे कामगार कल्याणाचे संपूर्ण काम देण्यात आलं. स्वातंत्र्योत्तर काळात, कामगार कल्याणच्या कामाची गती आणि पद्धती याला निर्णायक स्वरूप देण्याकरिता मुंबई सरकारने जून १९५३ मध्ये 'मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३' मंजूर केला. राज्य सरकारच्या कामगार कल्याणाबाबत बदललेल्या धोरण विषयक विचारांना पूरक असा नियोजनबद्ध व एकत्रित कामगार कल्याणचा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी हा कायदा करण्यात आला.

## संपादकीय »

### कोट्याच्या कपाळी

***"विद्यार्थी हे आत्महत्या शिकवणी वर्गामुळे करत नाहीत. त्यांच्यावर अपेक्षांचे ओझे लादणारे पालक या आत्महत्यांच्या मुळाशी आहेत"***

कोटा येथील 'कारखान्यांत' विद्यार्थ्यांच्या आत्महत्या वाढल्या म्हणून त्या कारखान्यांचे नियमन करण्याचे आदेश केंद्र सरकारने द्यावेत अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने निकालात काढली हे उत्तम झाले. मुंबईतील एका डॉक्टरने ही मागणी केली होती. राजस्थानातील कोटा हे शहर अलीकडे विशेष शिकवण्यांचे केंद्र म्हणून भलताच नावलौकिक मिळवते झाले. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या तुलनेने मागास मराठवाडय़ातील लातूर या शहराने राज्यापुरता असा लौकिक मिळवला होता. दहावीच्या परीक्षेत या शहरातून विद्यार्थ्यांच्या झुंडीच्या झुंडी गुणवत्ता यादीत येत. अशा वेळी खरे तर शहाण्यांनी गुणवत्ता यादीच्या गुणवत्तेवर संशय घेणे योग्य ठरले असते. पण झाले उलटेच. या लातूर शहरातील शिक्षणात काही जादू असल्याचा गवगवा झाला आणि 'लातूर पॅटर्न' नामे प्रकाराचा भलताच उदोउदो झाला.

**प्रबोधनकार, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचे हिंदूत्व कधीच वेगवेगळे नव्हते आणि नसेल. उद्धव ठाकरे यांचे वैचारिक अधिष्ठान मजबूत असल्याने आणि पिढीजात कणखरपणा त्यांच्या रक्तात असल्याने ते आपापल्या परीने लढत राहिले आहेत. प्रबोधनकारांना सनातनी हिंदूंशी लढावे लागले होते, बाळासाहेबांच्या काळात हिंदू-मुस्लीम द्वेष पुढे आला होता .**

## आमचे नव्हे, भाजपचेच हिंदूत्व डीपफेक

जॉर्ज फर्नांडिस, ना. ग. गोरे, एस. एम. जोशी यांच्यासोबत प्रबोधनकारांनी काम केले होते. बाळासाहेबांनी शिवसेना आणि प्रजा समाजवादी यांची युती केली होती. काँग्रेसशीही जुळवून घेतले होते. सेनापती बापट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एस. एम.जोशी, प्र. के. अत्रे, श्रीपाद डांगे, शाहीर अमर शेख, भाई उद्धवराव पाटील, प्रबोधनकार ठाकरे हे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील महत्त्वाचे नेते ठरले. प्रबोधनकारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत युती केली. उद्धवजींनी त्यांचा नातू अॅड. प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत युती केली. बाळासाहेब ठाकरे यांनी जॉर्ज फर्नांडिस यांच्या सोबत युती केली, उद्धवजींनी नितीशकुमार आणि समाजवादी साथींसोबत युती केली. विखुरलेल्या २१ पक्षांना सोबत घेतले. गद्दारांना त्यातले मर्म कळणार नाही. भाजपने आजपर्यंत सगळय़ांचा वापर करून त्यांना फेकूनच दिले आहे.




जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वात आणीबाणीविरोधात लढा दिला गेला तेव्हा हे त्यात जनसंघ म्हणून घुसले आणि मंत्रीपदे मिळवली. मग जनसंघाची शकले उडाल्यावर भाजप स्थापन केला आणि एक एक करत इतर पक्ष संपवायला सुरुवात केली. गोव्यातील मगोप, तमिळनाडूतील डीएमके- एआयएडीएमके, केरळमधील एलडीएफ, कर्नाटकमधील जेडीयू देवेगौडा (सध्या परत भाजपसोबत आहेत). महाराष्ट्रातील उदाहरण म्हणजे शिवसेना. गुजरातमध्ये भाजपनेच भाजपच्या अनेक नेत्यांना संपवले. बिगुल पार्टी आठवते? मध्य प्रदेशमधील उमा भारती आज कुठे आहेत? शिवराजसिंह यांच्या जीवावर मध्य प्रदेशमध्ये तीन वेळा सरकार आणले, आज त्यांनाच कोणी विचारेनासे झाले आहे. राजस्थानमध्ये वसुंधरा राजेंसोबतही तेच केले गेले. उत्तर प्रदेशमध्ये मायावती, हरियाणातील दृश्यंत सिंग, बिहारमध्ये नितीशकुमार, जम्मू-काश्मीरमध्ये महबूबा मुफ्ती, पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी.. भाजपचा एकच वादा, वापरा आणि फेका. हे ओळखून भाजपने आपल्याला फेकून देण्याआधी उद्धव ठाकरे यांनी भाजपलाच फेकले. पण हिंदूत्व सोडले नाही आणि सोडणारही नाहीत. मोदी नुकतेच मुंबईत येऊन ऑलिम्पिक भारतात आयोजित करणार अशी घोषणा करून गेले. म्हणजे आता विश्वचषकासारखेच ऑलिम्पिकच्या नावाखाली भरपूर पैसे गुजरातला वळवता येतील. भारत-पाकिस्तानच्या क्रिकेट सामन्याच्या वेळी पाकिस्तानी खेळाडूंचे स्वागत करताना त्यांच्यावर फुले उधळली गेली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 3495 एसटी बसेस सेवेत दाखल होणार

## » सह्याद्री बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांची घोषणा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील प्रत्येक बसस्थानकावर महिला बचत गटासाठी एक स्टॉल, जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या बसस्थानकावर आपला दवाखाना सुरू करण्याचे तसेच १० टक्के ठिकाणी माजी सैनिकांच्या विधवा पत्नींना तसेच दिव्यांगांना बसस्थानकावर स्टॉल देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज एसटी महामंडळाला दिले.**

प्रवाशांना चांगल्या सुविधेसाठी महामंडळात नवीन वर्षात ३ हजार ४९५ एसटी बसेस सेवेत दाखल करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी मंजुरी दिली. बसस्थानाकांच्या स्वच्छतेला प्राधान्य देतानाच त्यांचा चेहरामोहरा बदलावा असेही त्यांनी यावेळी सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची ३०३ वी संचालक मंडळ बैठक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.



एसटी महामंडळाला २० नोव्हेंबरला एका दिवशी ३६.७३ कोटी रुपये विक्रमी उत्पन्न झाल्याबद्दल मुख्यमंत्री शिंदे यांनी अभिनंदन केले. राज्यातील सामान्य नागरिकांना एसटीच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी महामंडळाने प्रयत्न केले पाहिजे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी तयार २२०० साध्या बसेस घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी मंजुरी दिली. यामुळे २२०० तयार परिवर्तन साध्या बसेस मार्च २०२४ अखेर एसटीच्या ताफ्यात दाखल होतील. याबरोबरच एसटीच्या २१ वेगवेगळ्या विभागांसाठी १२९५ साध्या बसेस भाडेतत्त्वावर घेण्यासाठी देखील याबैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील एकूण बसस्थानकांपैकी १० टक्के ठिकाणी माजी सैनिकांच्या विधवा पत्नींना दूध, दुग्धजन्य पदार्थ विक्रीचे स्टॉल देण्याच्या निर्णयाला तातडीने मंजुरी देतानाच मुख्यमंत्र्यांनी महिला बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येक बसस्थानकावर एक स्टॉल देण्याचे निर्देश दिले. यासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्याशी चर्चा करून योजना तयार करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्य शासनाच्या माध्यमातून सामान्यांना चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी राज्यात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू करण्यात येत आहे. त्यासाठी मोठ्या आणि जिल्ह्याच्या ठिकाणच्या बसस्थानकांवर आपला दवाखाना सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. एसटीतर्फे येत्या दोन वर्षांत ५१५० ई-बसेस भाडेतत्वावर घेण्यात येणार आहेत. जिल्हा आणि तालुकास्तरावर त्यांची सेवा देण्यात येणार आहे. या बससेवकरीता सामान्यांना परवडेल असेच तिकीट दर ठेवण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.प्रवाशांना चांगल्या सुविधेसाठी महामंडळात नवीन वर्षात ३ हजार ४९५ एसटी बसेस सेवेत दाखल करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी मंजुरी दिली. बसस्थानाकांच्या स्वच्छतेला प्राधान्य देतानाच त्यांचा चेहरामोहरा बदलावा असेही त्यांनी यावेळी सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची ३०३ वी संचालक मंडळ बैठक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

### बसस्थानकावर स्टॉल देण्याचे निर्देश

» मुख्यमंत्री शिंदे यांनी अभिनंदन केले. राज्यातील सामान्य नागरिकांना एसटीच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी महामंडळाने प्रयत्न केले पाहिजे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी तयार २२०० साध्या बसेस घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी मंजुरी दिली. यामुळे २२०० तयार परिवर्तन साध्या बसेस मार्च २०२४ अखेर एसटीच्या ताफ्यात दाखल होतील. याबरोबरच एसटीच्या २१ वेगवेगळ्या विभागांसाठी १२९५ साध्या बसेस भाडेतत्त्वावर घेण्यासाठी देखील याबैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यातील एकूण बसस्थानकांपैकी १० टक्के ठिकाणी माजी सैनिकांच्या विधवा पत्नींना दूध, दुग्धजन्य पदार्थ विक्रीचे स्टॉल देण्याच्या निर्णयाला तातडीने मंजुरी देतानाच मुख्यमंत्र्यांनी महिला बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येक बसस्थानकावर एक स्टॉल देण्याचे निर्देश दिले.

# एकाही महाविद्यालयाला सावित्रीबाईंचं नाव का नाही?

## » मनोज जरांगे पाटील यांचा भुजबळांना थेट प्रश्न

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षणासाठी लढा उभा करणारे मनोज जरांगे पाटील यांनी १५ नोव्हेंबरपासून पुन्हा एकदा महाराष्ट्र दौरा सुरु केला आहे. आज दुपारी मनोज जरांगे पाटील यांनी नाशिकमधल्या सभेत छगन भुजबळ यांच्यावर टीका केली. छगन भुजबळ यांना जेव्हा विचारण्यात आलं की मनोज जरांगे पाटील हे नाशिकमध्ये सभा घेणार आहेत तेव्हा ते म्हणाले की त्यांचं स्वागत आहे. त्यांना माझ्या शुभेच्छा आहेत असं म्हटलं होतं. अशात आता मनोज जरांगे पाटील यांनी छगन भुजबळ यांच्यावर जोरदार टीका केली.**




मनोज जरांगे पाटील यांनी छगन भुजबळ यांचं नाव घेता टीका केली. तू कुठे भाजी विकायचा, कुणाचे बंगले बळकवले?, मुंबईत तुम्ही काय केलं?, कोणत्या चित्रपटात नाटकात काम केलं? हे मला माहीत आहे.

२०१६ मधल्या महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणाची आठवणही जरांगे पाटील यांनी केली. महाराष्ट्र सदनात घोटाळा केला म्हणून तुरुंगात जावं लागलं, असंही ते म्हणाले. आधी व्यक्ती म्हणून त्यांचा विरोध करत नव्हतो त्यांच्या भूमिकेला विरोध होता. आता व्यक्ती म्हणूनही त्यांचा विरोध आम्ही करतो आहोत. कारण मराठा-ओबीसी वाद होतील अशी वक्तव्य तो माणूस करतो आहे. कायदा सांभाळण्याची जबाबदारी तुमच्या खांद्यावर आहे. तुम्ही दंगली होतील यासाठीची वक्तव्यं करु लागला. ३०-३५ वर्षे तुम्ही सत्ता भोगली आहे. तरीही त्यादिवशी तुमच्या पोटातली गटारगंगा तुम्ही त्या दिवशी दाखवलीत असंही जरांगे पाटील म्हणाले. मराठे जातीय दंगली या राज्यात होऊ देणार नाहीत हे लक्षात ठेवा.

ओबीसींना किती समस्या आहेत माहीत आहे का? ज्यांना फायदा मिळाला त्यांना मिळाला बाकीच्यांचं हा ओरबाडून खातोय. तरीही म्हणतो मला कमी पडतं आहे. आपण दंगली कराव्यात हा यांचा उद्देश आहे. पण तू कितीही विरोध कर आम्ही आरक्षण मिळवणारच. म्हाताऱ्या माणसाने आता बोलू नये, जास्त बोलू नये, पाणी कमी पडू शकते. आता नाही, आरक्षण मिळू द्या मग बघतो. यांचं आपल्याला सगळं माहिती आहे आड येऊ नको. तुमच्या एकाही महाविद्यालयाला सावित्रीबाईंचे नाव का दिलं नाही? असा सवाल करत मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.मनोज जरांगे पाटील यांनी छगन भुजबळ यांचं नाव घेता टीका केली. तू कुठे भाजी विकायचा, कुणाचे बंगले बळकवले?, मुंबईत तुम्ही काय केलं?, कोणत्या चित्रपटात नाटकात काम केलं? हे मला माहीत आहे. २०१६ मधल्या महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणाची आठवणही जरांगे पाटील यांनी केली. महाराष्ट्र सदनात घोटाळा केला म्हणून तुरुंगात जावं लागलं, असंही ते म्हणाले.

### कायदा सांभाळण्याची जबाबदारी

» २०१६ मधल्या महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणाची आठवणही जरांगे पाटील यांनी केली. महाराष्ट्र सदनात घोटाळा केला म्हणून तुरुंगात जावं लागलं, असंही ते म्हणाले. आधी व्यक्ती म्हणून त्यांचा विरोध करत नव्हतो त्यांच्या भूमिकेला विरोध होता. आता व्यक्ती म्हणूनही त्यांचा विरोध आम्ही करतो आहोत. कारण मराठा-ओबीसी वाद होतील अशी वक्तव्य तो माणूस करतो आहे. कायदा सांभाळण्याची जबाबदारी तुमच्या खांद्यावर आहे. तुम्ही दंगली होतील यासाठीची वक्तव्यं करु लागला. ३०-३५ वर्षे तुम्ही सत्ता भोगली आहे. तरीही त्यादिवशी तुमच्या पोटातली गटारगंगा तुम्ही त्या दिवशी दाखवलीत असंही जरांगे पाटील म्हणाले. मराठे जातीय दंगली या राज्यात होऊ देणार नाहीत हे लक्षात ठेवा.

# अमेठीला गेलो नाही तरी नवरदेव!

## असदुद्दीन ओवैसींचा राहुल गांधींना टोला





। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाचे प्रमुख आणि खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी काँग्रेस पक्षावर आणि खासदार राहुल गांधी यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. ओवैसी म्हणाले, आम्ही अमेठीला गेलो नाही तरी नवरदेव तिथे लोकसभा निवडणुकीत पराभूत झाले. स्मृती इराणी यांनी त्यांना (राहुल गांधी) त्यांच्या वडिलांच्या, आजीच्या, आजोबांच्या मतदारसंघात हरवलं. त्याच मतदारसंघात आम्ही (एआएमआयएम) प्रचाराला गेलो असतो तर काँग्रेस पार्टी किती रडली असती.**

वर्षानुवर्षे त्यांच्या ताब्यात असलेल्या मतदारसंघात इराणी यांनी त्यांना तिथे हरवलं. आम्ही आमच्या प्रचाराला गेलो नव्हतो तरी हे हरले, आम्ही गेलो असतो तर हे लोक किती रडले असते. तुम्ही तुमच्या आईची, वडिलांची, आजीची सीट वाचवू शकला नाही.

खासदार ओवैसी एवढ्यावरच थांबले नाहीत. ते म्हणाले, राहुल गांधी वायनाड (केरळ) या मतदारसंघातही पराभूत झाले असते. परंतु, मुस्लीम लीगने तिथे त्यांना ३५ टक्के मतं मिळवून दिली. मुस्लीम मतदारांमुळे राहुल गांधी वायनाडमध्ये जिंकले. काँग्रेसची सध्याची परिस्थिती पाहता त्यांच्याकडे आता जे काही मतदार आहेत ते मुस्लीम आहेत. त्यामुळेच काँग्रेस पक्ष मुस्लीम नेतृत्वामुळे त्रस्त आहे. तेलंगणा काँग्रेसचे प्रमुख रेवंत रेड्डी यांनी काही दिवसांपूर्वी असदुद्दीन ओवैसी यांच्यावर टीका केली होती. ओवैसी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या हातातलं बाहुलं आहे, असं रेड्डी यांनी म्हटलं होतं. या टीकेला उत्तर देताना ओवैसी म्हणाले, काँग्रेस फक्त आपल्या कपड्यांवरुन आणि दाढीवरुन आरोप करत असते, आरोप करायला काही मिळालं नाही की अशा प्रकारे आरोप केले जातात. हे लोक मला कळसुत्री बाहुली म्हणतात. परंतु, मी म्हणतो ती कळसुत्री बाहुली तुम्हीच आहात. भाजपा आणि काँग्रेस यांच्यात काहीच अंतर नाही. ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाचे प्रमुख आणि खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी काँग्रेस पक्षावर आणि खासदार राहुल गांधी यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. ओवैसी म्हणाले, आम्ही अमेठीला गेलो नाही तरी नवरदेव तिथे लोकसभा निवडणुकीत पराभूत झाले. स्मृती इराणी यांनी त्यांना (राहुल गांधी) त्यांच्या वडिलांच्या, आजीच्या, आजोबांच्या मतदारसंघात हरवलं. त्याच मतदारसंघात आम्ही (एआएमआयएम) प्रचाराला गेलो असतो तर काँग्रेस पार्टी किती रडली असती.

### हे लोक मला कळसुत्री बाहुली म्हणतात

» राहुल गांधी वायनाड (केरळ) या मतदारसंघातही पराभूत झाले असते. परंतु, मुस्लीम लीगने तिथे त्यांना ३५ टक्के मतं मिळवून दिली. मुस्लीम मतदारांमुळे राहुल गांधी वायनाडमध्ये जिंकले. काँग्रेसची सध्याची परिस्थिती पाहता त्यांच्याकडे आता जे काही मतदार आहेत ते मुस्लीम आहेत. त्यामुळेच काँग्रेस पक्ष मुस्लीम नेतृत्वामुळे त्रस्त आहे. तेलंगणा काँग्रेसचे प्रमुख रेवंत रेड्डी यांनी काही दिवसांपूर्वी असदुद्दीन ओवैसी यांच्यावर टीका केली होती. ओवैसी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या हातातलं बाहुलं आहे, असं रेड्डी यांनी म्हटलं होतं. या टीकेला उत्तर देताना ओवैसी म्हणाले, काँग्रेस फक्त आपल्या कपड्यांवरुन आणि दाढीवरुन आरोप करत असते, आरोप करायला काही मिळालं नाही की अशा प्रकारे आरोप केले जातात. हे लोक मला कळसुत्री बाहुली म्हणतात. परंतु, मी म्हणतो ती कळसुत्री बाहुली तुम्हीच आहात. भाजपा आणि काँग्रेस यांच्यात काहीच अंतर नाही.

# अनुसूचित उपजातींना वेगळा कोटा द्या!

## कर्नाटकामधील दलित मंत्र्यांची मागणी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



**अनुसूचित जातीच्या आरक्षणाचा आढावा घेण्यासाठी २०१२ साली नेमलेल्या न्यायमूर्ती ए. जे. सदाशिव आयोगाच्या अहवालाची अंमलबजावणी करायची की नाही? याबाबतचा निर्णय केंद्राने घ्यावा, असे संकेत कर्नाटक काँग्रेस सरकारने दिले आहेत. सदर अहवाल स्वीकारून अनुसूचित जातींमध्ये अंतर्गत आरक्षण कोटा निश्चित करावा, अशी मागणी काँग्रेस पक्षातील अनुसूचित जातींच्या नेत्यांनी राज्य सरकारकडे केली आहे.**

त्यानंतर काँग्रेसने या विषयाचा चेंडू केंद्र सरकारच्या कोर्टात ढकलला. २००५ साली काँग्रेस-जनता दल (धर्मनिरपेक्ष) पक्षाच्या सरकारने सदर आयोगाची स्थापना केली होती. अनुसूचित जातींसाठी असलेल्या आरक्षणाचा आढावा घेऊन उपजातींना वेगळा कोटा द्यावा का? यातून मार्ग काढण्यासाठी हा आयोग नेमला होता. सूत्रांच्या माहितीनुसार, मागच्या भाजपा सरकराने या अहवालाचा काही भाग अंशतः स्वीकारला होता.

त्यामुळे काँग्रेस सरकारने हा विषय केंद्रातील भाजपापुढे सरकावला आहे. "न्यायमूर्ती सदाशिव आयोगाचा अहवाल सध्यातरी राज्याच्या विचाराधीन नाही. याआधीच्या सरकारने अहवालातील काही भाग स्वीकारला असून अनुसूचित जातींमध्ये अंतर्गत राखीव जागा निर्माण करून त्याची अंमलबजावणी करण्याबाबत त्यांनी केंद्र सरकारला पत्र लिहिले होते. त्यामुळे हा विषय आता केंद्राच्या अखत्यारित आहे", अशी भूमिका विधी मंत्रालयातील अधिकाऱ्याने व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ११ नोव्हेंबर रोजी कर्नाटकच्या शेजारी असलेल्या तेलंगणा राज्यात भाषण करत असताना अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व जातींना आरक्षणाचा लाभ मिळावा, यासाठी अंतर्गत कोटा निर्माण करणार असल्याचे जाहीर केले होते. त्यासाठी तेलंगणामध्ये मदिगा आरक्षण पोरोटा समिती (MRPS) स्थापन केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर लगेचच कर्नाटक राज्यातील अनुसूचित जातीच्या तीन मंत्र्यांनी राज्यातील काँग्रेस सरकारवर सदाशिव आयोग स्वीकारण्याची मागणी केली. यामध्ये गृहमंत्री जी. परमेश्वरा, सामाजिक कल्याण मंत्री एच. सी. महादेवप्पा आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री के. एच. मुनियप्पा यांचा समावेश होता.

# पाकिटमार कधीच एकटा येत नाही!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी राजस्थानमधल्या सभेत पंतप्रधान मोदींवर शेलक्या शब्दांमध्ये टीका केली आहे. पाच राज्यांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राहुल गांधी, नरेंद्र मोदी यांचे दौरे सुरु आहेत. अशात एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी राहुल गांधी आणि नरेंद्र मोदी सोडत नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अदाणींना सगळं आंदण कसं दिलं याची उदाहरणं राहुल गांधी कायमच देत असतात. आज झालेल्या भाषणात राहुल गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि गौतम अदाणी यांची तुलना पाकिटमारांशी केली आहे. "पाकिटमार कधीच एकटा येत नाही, तिघेजण असतात. तिथे येतात, कारण पाकिटमार एकटा समोरुन आला तर तो आपला खिसा कसा कापणार? तिघे येतात, एक समोरुन, एक पाठीमागून आणि एक लांब उभा असतो. समोरचा खिसेकापू तुमचं लक्ष विचलित करतो. तो तुम्हाला सांगेल काहीतरी पडलंय. तुमचं लक्ष विचलित झालं की मागचा खिसेकापू तुमचा खिसा कापतो. तिसरा हे सगळं बघत असतो, कुणी येऊ नये हे घडतंय बघायला याची काळजी घेतो किंवा तो पाकिट घेऊन पळून जातो."

"नरेंद्र मोदींचं काम तुमचं लक्ष भरकटवण्याचं आहे. त्यामुळेच ते समोरुन येतात. टीव्हीवर आपल्याशी संवाद साधतात. हिंदू-मुस्लिम, जीएसटी, नोटबंदी, मला फाशी द्या वगैरे वक्तव्य करतात. तेवढ्यात मागून अदाणी येतात तुमचे पैसे घेऊन जातात. तिसरा माणूस म्हणजे अमित शाह, ते कुणाला हे घडलंय कळू नये याची काळजी घेतात.

# 'मिस युनिव्हर्स 2023'मध्ये रचला इतिहास

'मिस युनिव्हर्स 2023' (MISS UNIVERSE 2023) ही स्पर्धा वेगवेगळ्या कारणाने खास ठरली आहे. 'मिस युनिव्हर्स' ही दरवर्षी घेतली जाणारी एक जागतिक पातळीवरील सौंदर्य स्पर्धा आहे. जगातील सर्वात लोकप्रिय सौंदर्य स्पर्धा म्हणून ही मानली जाते. यंदा तृतीयपंथीयांपासून ते प्लस साईजपर्यंत अनेक स्पर्धक या आंतरराष्ट्रीय सौंदर्य स्पर्धेत सहभागी झाले होते. यंदा सहभागी झालेल्या स्पर्धकांनी इतिहास रचला आहे. सध्या नेपाळची प्लस साईज मॉडेल जेन दीपिका गैरेट (JANE DIPIKA GARRETT) चर्चेत आहे. 'मिस युनिव्हर्स 2023'मधील जेन दीपिका गैरेट या स्पर्धकाने झिरो फिगर, फिट अ‍ॅन्ड फाईन असा टॅग मोडून काढला आहे. मिस नेपाळ जेन दीपिका गैरेटचा आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत बोलबाला आहे. 22 वर्षीय गैरेटच्या रॅम्प वॉकने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. उपस्थित असलेला प्रत्येक जण जेन दीपिका गैरेटचा मोठा चाहता झाला आहे. जेन दीपिका गैरेटने आपल्या सौंदर्याने आणि आत्मविश्वासाच्या जोरावर सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. 'मिस युनिव्हर्स 2023' या स्पर्धेत सहभागी झालेल्या मिस नेपाळ जेन दीपिका गैरेटने बॉडी पॉजिटिव्हिटीचा संदेश दिला आहे. सौंदर्यवतींनी आपल्या साईजकडे लक्ष न देता फॅशन आणि सौंदर्य तसेच लूककडे लक्ष द्यायला हवं, असं जेन दीपिका गैरेटचं मत आहे. 'मिस नेपाळ' ठरलेल्या जेन दीपिका गैरेटने 20 स्पर्धकांना हरवलं आहे. जेन दीपिका गैरेट मॉडेल असण्यासोबत नर्स आणि बिझनेस डेव्हलपरदेखील आहे. महिलांच्या मानसिक आरोग्यासाठी तिने प्रयत्न केले आहेत. हार्मोन्सच्या समस्यांमुळे जेनचं वजन वाढलं. जेन दीपिका गैरेटचा जन्म अमेरिकेत झाला आहे. सध्या ती नेपाळमधील काठमांडू परिसरात राहते. सध्या जगभरात तिचं नाव चर्चेत आहे. बॉडी पॉजिटिव्हिटीचा चांगला संदेश देणाऱ्यांच्या यादीत जेन दीपिका गैरेटचा समावेश होतो. जेन दीपिका गैरेट आज जगभरात लोकप्रिय असली तरी 'मिस युनिव्हर्स 2023' या स्पर्धेआधी ती वाढलेल्या वजनामुळे चर्चेत आली होती. वाढलेल्या वजनामुळे ती आत्महत्या करायला लागली होती. एक वर्षाआधी तिने आत्महत्या करण्याचा प्रयत्नही केला होता. पण आता याच वाढलेल्या वजनाची दखल जगाला घ्यायला लावली.

# तापसीच्या प्रेमात 'लुट पूट' शाहरुख



बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खान (SHAH RUKH KHAN) सध्या त्याच्या आगामी 'डंकी' (DUNKI) या सिनेमामुळे चर्चेत आहे. लवकरच हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आता या सिनेमातील 'लुट पूट गया' (LUTT PUTT GAYA) हे पहिलं गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. या नव्या गाण्याची प्रेक्षकांना उत्सुकता आहे. शाहरुख खान 2023 मध्ये 'डंकी'च्या माध्यमातून तिसऱ्यांदा धमाका करण्यासाठी सज्ज आहे. वर्षाच्या शेवटी किंग खानचा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वीच अभिनेत्याने डंकीचा फर्स्ट ड्रॉप शेअर केला होता. आता ड्रॉप 2 देखील प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. 'डंकी' सिनेमातील 'लुट पूट गया' या पहिल्या गाण्यात शाहरुख खान, तापसी पन्नूची झलक पाहायला मिळत आहे. या व्हिडीओमध्ये दोघेही तरुण दिसत आहेत. किंग खान आणि तापसी पन्नूच्या रोमँटिक केमिस्ट्रीने प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलं आहे. शाहरुखने 'डंकी' या सिनेमाच्या गाण्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओवर चाहत्यांनी कमेंट्सचा वर्षाव केला आहे. आता फक्त सिनेमाची प्रतीक्षा, पठाण, आणि जवाननंतर आता डंकी करणार धमाका, डंकीसाठी आम्ही खूप उत्सुक आहोत, किंग खानला

# 'डंकी'बद्दलची चाहत्यांची उत्सुकता वाढली

बॉलिवूडचा सुपरस्टार शाहरुख खान (SHAH RUKH KHAN) सध्या 'डंकी' (DUNKI) या सिनेमामुळे चर्चेत आहे. लवकरच हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'डंकी'आधी 'पठाण' (PATHAAN) आणि 'जवान' (JAWAN) हे शाहरुखचे सिनेमे प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. यास सिनेमांनी बॉक्स ऑफिसवर धमाका केला आहे. दोन सिनेमे यशस्वी झाल्यानंतर आता तिसऱ्या सिनेमासाठीही किंग खानने खूप मेहनत घेतली आहे. शाहरुखच्या आगामी 'डंकी' या सिनेमाची चाहत्यांना उत्सुकता आहे. या सिनेमात अभिनेता अजय कुमार एक छोटी भूमिका साकारत आहे. दरम्यान एका मुलाखतीत अजय म्हणाला,"चार ओळीच्या एका शॉट साठी किंग खानने अनेक तास मेहनत घेतली आहे. कित्येक टेक दिले आहेत. एक शॉट परफेक्ट देण्यासाठी तो चांगलीच मेहनत घेत आहे". अजय कुमार पुढे म्हणाला,"सिनेमातील एक सीन फक्त दोन मिनिटांचा होता. पण हा सीन परफेक्ट करण्यासाठी शाहरुखने तब्बल सहा तास मेहनत घेतली आहे. तसेच शाहरुखने माझ्यासोबत या सीनची 20-25 मिनिटे तालिमदेखील केली आहे. 25 वेगवेगळ्या व्हेरिएशनचा हा सीन आहे. हा सीन शूट होईपर्यंत सहा तास किंग खान त्यावर खूप मेहनत घेत होते". शाहरुखच्या 'पठाण', 'जवान' या सिनेमांनी 2023 हे वर्ष गाजवलं आहे. आत त्याचा 'डंकी' हा सिनेमा बॉक्स ऑफिस गाजवण्यासाठी सज्ज आहे. वर्षाच्या शेवटी 'डंकी' हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर रेकॉर्डब्रेक कमाई करणार आहे. त्यामुळे या सिनेमाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. या सिनेमासाठी किंग खानने चांगलच मानधन घेतलं आहे. शाहरुख खानचा 'डंकी' हा सिनेमा 22 डिसेंबर 2023 रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. राजकुमार हिरानी (RAJKUMAR HIRANI) यांनी या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. 'डंकी' या सिनेमात शाहरुखसह विकी कौशल, तापसी पन्नू, बोमन ईरानी आणि सतीश शाह हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहेत. 'डंकी'ची घोषणा झाल्यापासून प्रेक्षक या सिनेमाची प्रतीक्षा करत आहेत.

# विकी कौशलच्या 'सॅम बहादुर' सिनेमातील नवं गाणं आऊट

बॉलिवूड अभिनेता विकी कौशल (VICKY KAUSHAL) सध्या 'सॅम बहादुर' (SAM BAHADUR) या सिनेमामुळे चर्चेत आहे. आता या सिनेमातील 'रब का बंदा' (RAB KA BANDA) हे नवं गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. गुलजारांनी (GULZAR) लिहिलेल्या आणि शंकर महादेवन (SHANKAR MAHADEVAN) यांनी गायलेल्या 'रब का बंदा' (RAB KA BANDA) या गाण्याने प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलं आहे. 'सॅम बहादूर' हा 2023 मधला बहुप्रतिक्षित सिनेमा असणार आहे. मेघना गुलजार यांनी या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. या सिनेमाची चांगलीच चर्चा रंगली आहे. प्रेक्षक या सिनेमाची आतुरतेने वाट पाहत आहेत. चाहत्यांची वाढली उत्सुकता लक्षात घेत निर्मात्यांनी आता या सिनेमातील 'रब का बंदा' हे नवं गाणं रिलीज केलं आहे. 'सॅम बहादूर' या सिनेमातील 'रब का बंदा' हे नवं गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. याआधी या सिनेमातील 'बढते चलो' हे गाणं प्रेक्षकांच्या भेटीला



आलं होतं. आता रिलीज झालेलं 'रब का बंदा' हे गाणंही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलं आहे. 'रब का बंदा' या गाण्यातही एक जोश आहे. 'रब का बंदा' या गाण्यात विकी कौशल सॅम मानेकशॉंच्या भूमिकेत दिसत आहे. या गाण्यात सॅम मानेकशॉ यांच्या आयुष्याची झलक दाखवण्यात आली आहे. सॅम मानेकशॉ यांची ताकद, साहस यावर भाष्य करणारं हे गाणं आहे. विकीने या गाण्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. व्हिडीओ शेअर करत त्याने लिहिलं आहे,"अ फोर्स ऑफ स्ट्रेन्थ, एक महान सैनिक...रब का बंदा है, सब का बंदा है". 'सॅम बहादूर' या सिनेमातील 'रब का बंदा' हे गाणं गुलजारांनी (GULZAR) लिहिलं आहे. तर शंकर महादेवन (SHANKAR MAHADEVAN) यांनी हे गाणं गायलं आहे. 'सॅम बहादूर' या सिनेमातील सर्वच गाणी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहेत. 'रब का बंदा' या गाण्याचा म्यूझिक व्हिडीओ आता प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या व्हिडीओमध्ये विकी कौशल सॅम मानेकशॉंच्या दमदार भूमिकेत दिसत आहे. सॅम बहादुर या सिनेमात इंदिरा गांधी यांच्या भूमिकेत फातिमा सना शेख दिसणार आहे. तर सॅम मानेकशॉंच्या पत्नीच्या भूमिकेत सान्या मल्होत्रा दिसणार आहे. 1 डिसेंबर 2023 रोजी हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# काही खेळाडूंची अदलाबदल!

## पडिक्कल लखनऊ तर आवेश राजस्थानच्या ताफ्यात

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयपीएलच्या आगामी हंगामासाठी खेळाडूंचा लिलाव १९ डिसेंबरला होणार आहे. त्याआधी फ्रँचायझींमध्ये खेळाडूंबाबत खरेदीची प्रक्रिया सुरू आहे. या क्रमवारीत राजस्थान रॉयल्स आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात करार झाला आहे. राजस्थानचा फलंदाज देवदत्त पडिक्कल पुढील वर्षी के.एल. राहुलच्या नेतृत्वाखाली लखनऊ सुपर जायंट्सकडून खेळताना दिसणार आहे. फ्रँचायझीने याबाबत अधिकृत घोषणा केली आहे. त्याचवेळी वेगवान गोलंदाज आवेश खान राजस्थान संघात सामील झाला आहे.**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी टी-२० मालिकेसाठी टीम इंडियात निवड झाली आहे. त्याला लखनऊने २०२२ मध्ये १० कोटी रुपयांना विकत घेतले होते. दुसरीकडे, देवदत्त पडिक्कलला राजस्थानने ७.७५ कोटी रुपयांना विकत घेतले. यंदाच्या आयपीएलपूर्वी आवेश आणि देवदत्त यांना त्यांच्या संघांनी कायम ठेवले होते.



देवदत्त आणि आवेश यांनी आयपीएलमध्ये चांगली सुरुवात केली होती, पण २०२३च्या मोसमात त्यांची कामगिरी चांगली नव्हती. विशेषत: पडिक्कल २०२२ मध्ये १७ सामने आणि २०२३ मध्ये ११ सामने खेळूनही राजस्थानसाठी आपली छाप सोडू शकला नाही. त्याने दोन हंगामात २८ सामन्यात २३.५९च्या सरासरीने आणि १२५.८८च्या स्ट्राईक रेटने ६३७ धावा केल्या. या काळात त्याला केवळ तीन अर्धशतके करता आली. पडिक्कलने आयपीएलमधील एकूण ९२ सामन्यांमध्ये ३३.३४च्या सरासरीने २७६८ धावा केल्या आहेत. त्याने तीन शतके आणि १७ अर्धशतके केली आहेत. त्याचा स्ट्राइक रेट १३३.५२ आहे. लखनऊ सुपर जायंट्स हा पडिक्कलचा तिसरा आयपीएल संघ असेल. यापूर्वी तो २०२० आणि २०२१ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळला होता. आवेश खानबद्दल जर सांगायचे तर राजस्थान रॉयल्स हा त्याचा तिसरा संघ असेल. त्याने २०२१ मध्ये दिल्ली कॅपिटल्सकडून पदार्पण केले होते. त्यानंतर त्याने २४ विकेट्स घेतल्या. यानंतर दिल्लीने त्याला मेगा-लिलावासाठी संघातून वगळले. लिलावात तिन्ही संघांना हरवून लखनऊने आवेशला विकत घेतले होते. २०२२ मध्ये, तो लखनऊसाठी सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज होता आणि त्यांचा संघ प्लेऑफमध्ये पोहोचला. २०२३ मध्ये लखनऊच्या संथ खेळपट्ट्यांवर आवेशची गोलंदाजी प्रभावी ठरली नाही. त्याला नऊ सामन्यांत केवळ पाच वेळा चार षटकांचा कोटा पूर्ण करता आला. या मोसमात त्याला केवळ आठ विकेट्स मिळाल्या. आवेश डिसेंबरमध्ये २७ वर्षांचा होईल. तो पुन्हा एकदा आयपीएलमध्ये छाप पाडण्यासाठी सज्ज आहे. राजस्थानमध्ये त्याला प्रसिध कृष्णा, नवदीप सैनी, कुलदीप सेन, संदीप शर्मा आणि के.एम. आसिफ यांची साथ मिळेल. आगामी आयपीएल हंगामापूर्वी होणारा असा हा दुसरा व्यापार आहे. यापूर्वी मुंबई इंडियन्सने लखनऊ सुपर जायंट्सकडून रोमॅरियो शेफर्डचा व्यवहार केला होता. सर्व संघांना २६ नोव्हेंबरपर्यंत कायम ठेवलेल्या खेळाडूंची यादी सादर करायची आहे. १९ डिसेंबर रोजी दुबई येथे लिलाव होणार आहे.

### आवेशचा राजस्थान तिसरा संघ

देवदत्त आणि आवेश यांनी आयपीएलमध्ये चांगली सुरुवात केली होती, पण २०२३च्या मोसमात त्यांची कामगिरी चांगली नव्हती. विशेषत: पडिक्कल २०२२ मध्ये १७ सामने आणि २०२३ मध्ये ११ सामने खेळूनही राजस्थानसाठी आपली छाप सोडू शकला नाही. त्याने दोन हंगामात २८ सामन्यात २३.५९च्या सरासरीने आणि १२५.८८च्या स्ट्राईक रेटने ६३७ धावा केल्या. या काळात त्याला केवळ तीन अर्धशतके करता आली. पडिक्कलने आयपीएलमधील एकूण ९२ सामन्यांमध्ये ३३.३४च्या सरासरीने २७६८ धावा केल्या आहेत. त्याने तीन शतके आणि १७ अर्धशतके केली आहेत. त्याचा स्ट्राइक रेट १३३.५२ आहे. लखनऊ सुपर जायंट्स हा पडिक्कलचा तिसरा आयपीएल संघ असेल. यापूर्वी तो २०२० आणि २०२१ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळला होता. आवेश खानबद्दल जर सांगायचे तर राजस्थान रॉयल्स हा त्याचा तिसरा संघ असेल.

# ऑस्ट्रेलियाने वर्ल्डकप कसा जिंकला?

## ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंची चपळता आपल्या खेळाडूंपेक्षा जास्त

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलियाच्या चौफेर क्षेत्ररक्षणामुळे आपल्या हातून विश्वचषक निसटला आणि त्यानिमित्ताने क्रीडा पोषणतज्ज्ञ म्हणून खेळाडूंच्या आहाराबाबत आणखी थोडीशी माहिती सगळ्यांनाच पाहायला हवी याबाबतची जाणीव झाली. मुळात क्रिकेटसारखा खेळ ज्याला आपण मिश्र खेळ म्हणतो यामध्ये ताकद, वेग, चपळता यांचा देखील समावेश असतो. आपले बरेचसे क्रिकेटपटू हे विशेषतः आत्ताचे. आपला उत्कृष्ट संघ होता.**

आपले क्षेत्ररक्षण, आपले फलंदाज गोलंदाज या तिन्ही बाबतीमध्ये आपण उजवे होतो मात्र ज्यावेळी ऑस्ट्रेलियच्या क्षेत्ररक्षणाची आणि आपल्या क्षेत्ररक्षणामधील फरकाची आपण तुलना करतो त्यावेळी आपल्याला हे लक्षात येईल की ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंची चपळता आपल्या खेळाडूंपेक्षा जास्त होती. क्रिकेटपटूंचा सामन्यांपेक्षा जास्त वेळ हा ट्रेनिंग मध्ये असतो. त्यांच्या ट्रेनिंगमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या कसरती करून घेतल्या जातात, म्हणजेच क्षेत्ररक्षण फलंदाजी गोलंदाजी या तिन्ही आघाड्यांवर उपयुक्त अशा प्रकारचे ट्रेनिंग क्रिकेटरपटूंना दिले जाते. ट्रेनिंगच्या आधीच आहार हा देखील तितकाच महत्वाचा असतो. अनेकदा ट्रेनिंगच्या आधी दोन तास आधी पूर्ण जेवण किंवा फळे किंवा स्मूदी अशा प्रकारचा आहार दिला जातो. काही क्रिकेटपटू अशा वेळेला स्नॅक बार किंवा नट्स बार किंवा दही आणि म्युसली अशा प्रकारचा आहार देखील घेतात. काहीजण हलक्या तेलामध्ये परतलेल्या भाज्या किंवा मोठ्या प्रमाणात पालेभाज्यांचा समावेश त्यांच्या ट्रेनिंगच्या आधीच्या आहारात करतात.



वातावरणाचादेखील परिणाम क्रिकेटपटूंच्या सरावावर होत असतो. एखादा क्रिकेटपटू समशीतोष्ण हवामानामध्ये खेळत असतो त्यावेळी समशीतोष्ण हवामानानुसार त्यांची हाइड्रेशन स्ट्रॅटेजी म्हणजे शरीरातील आर्द्रता राखण्यासाठी प्यायला जाणारे पाणी किंवा रस यांचे प्रमाण ठरवण्यासाठी देखील आवश्यक ठरते. आपण पाहिले असेल की क्रिकेट सामन्यात जे ब्रेक असतात याला ड्रिंक्स ब्रेक असे म्हटले जाते. अनेकदा खेळाडू वेगळ्या प्रकारची द्रव्ये या दरम्यान पिताना आढळतात. हायड्रेशन म्हणजे शरीरातील आर्द्रता राखणे हा त्यातील सगळ्यात महत्वाचा मुद्दा असतो. आपण विश्वचषकाच्या दरम्यान पाहिलेच असतील की खेळाडू अनेकदा वेगवेगळ्या प्रकारचे पाणी पिताना आपल्याला दिसतात. या प्रकारचे पाणी आहारात ठेवताना ते ठराविक प्रमाणात प्यायले जावे याची काळजी घेतली जाते. अनेकदा क्रिकेटपटू मैदानी खेळासाठी वेगवेगळ्या प्रकारचे सोडियम पोटॅशियम क्लोराइड साखर यांचे प्रमाण असणारी द्रव्ये खेळाडूंना दिली जातात याला हायपर टॉनिक आयसोटोनिक किंवा हायपोटोनिक ड्रिंक्स असे म्हटले जाते. या द्रव्यातील सोडियम , क्षार आणि पाणी मात्रेवर या द्रव्यांचा प्रकार ठरवला जातो. शक्यतो क्रिकेटसारख्या जास्त वेळ चालणारा सामन्यांमध्ये बऱ्यापैकी शरीरातले पाणी कमी होत असते अशावेळी योग्य वेळी योग्य प्रमाणात सोडियम आणि क्षारांचे प्रमाण शरीरात राखले जाणे अत्यंत आवश्यक असते.

### आपण सलग 10 सामने जिंकले

ट्रेनिंग नुसार कर्बोदके आणि प्रथिने यांचे प्रमाण बदलत असताना खेळाडूच्या मनावरील ताण हा देखील तितकाच महत्वाचा भाग असतो. शारीरिक आणि मानसिक ताणाचे संयोजन योग्य प्रकारे करणे, आहारातील पोषण घटकांचे संयोजन योग्य प्रकारे करणे आणि एक संतुलित आहार क्रिकेटपटूला अत्यंत चांगला खेळाडू बनवू शकतो. चपळता वाढवणे, ताकद वाढवणे त्यांच्या क्रिकेटमधील वैशिष्ट्यानुसार म्हणजे फलंदाजी गोलंदाजी क्षेत्ररक्षण यासारख्या मुख्य कामानुसार त्यांच्या आहारात बदल करून आवश्यक ते आवश्यक ती शरीरयष्टी तयार करून घेणे यासारखे महत्त्वाचे कार्य योग्य आहारामुळे होऊ शकते. सुदैवाने अलीकडे भारतीय क्रिकेटमध्ये देखील फिटनेस हा सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा आहे आणि त्यानुसार क्रिकेटपटू आपल्या आहारात बदल करत आहेत ही अत्यंत चांगली गोष्ट आहे. या वर्ल्डकपमध्ये आपण सलग १० सामने जिंकलेले आहेत हेच आपल्या क्रिकेटपटूंच्या उत्तम आहाराचं, दिनचर्येचं आणि फिटनेसचं प्रमाण समजू शकतो.